MHAH220007682020

रे.मु.नं. ११८/२०२०
संजय केरु टकले वि. कैलास बाबा टकले व इतर

<u>आदेश</u>
(नि.क्र.६० खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र. ६ व ८ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी दाखल केला आहे.

२. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये आणि स.नं. ४३/२अ या जमिनीचे वादी यांचे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा प्रतिवादी क्र. १ ते ९ विरुध्द मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र. ६ ही दि. ०१/०२/२०२४ रोजी व प्रतिवादी क्र. ८ दि. १३/०३/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. ६ लक्ष्मीबाई रावसाहेब खरात यांना पुढीलप्रमाणे वारस आहेत. ६अ. बबन रावसाहेब खरात, ६ब. मोहन रावसाहेब खरात, ६क. कल्याण रावसाहेब खरात, ६ड. रामदास रावसाहेब खरात (मयत) वारस ६ड१. लंकाबाई रामदास खरात, ६ड२. सुजीत रामदास खरात, ६ड३ विशाल रामदास खरात, ६ड४ काजल सागर कोळेकर, ६इ. सुंदरबाई अशोक टेंगळे, ६ई. सखुबाई पांडूरंग बरकडे हे प्रतिवादी क्र. ६ चे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ८ तुकाराम रखमाजी टकले (मयत) यांना पुढीलप्रमाणे वारस आहेत. ८अ. पोपट तुकाराम टकले, ८ब. सरस्वती पोपट टकले, ८क. सुनंदा हरिभाऊ महारनवर, ८ड संगीता बाबासाहेब करगळ व ८इ. कस्तुराबाई बबन खरात हे वारस आहेत. वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. ६ व ८ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेत यावे व त्याप्रमाणे नि.क्र.१ वर दुरुस्ती करण्यात यावी अशी वादीतर्फे विनंती करण्यात आली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

४. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. ६ व ८ यांचे वारसदार

अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र. ६ व ८ यांचा मृत्यु झाल्याबाबत व अर्जात नमुद केलेले त्यांचे वारस असल्याबाबत नाकारलेले नाहीत. वादीला प्रतिवादी क्र. ६ व ८ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफीचा अर्ज मंजुर करण्यात आलेला आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीने मयत प्रतिवादी क्र.६ लक्ष्मीबाई रावसाहेब खरात व मयत प्रतिवादी क्र. ८ तुकाराम रखमाजी टकले यांचे अर्जात नमुद केलेले वारसदार यांना वादपत्रात सामील करावे व अर्जात नमुद केलेली दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्ती वादपत्र अभिलेखावर दाखल करावे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.11 18:21:30 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :११/०३/२०२६.